# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

क्र.:-११/इब/एक-०१३५
दिनांक :- २२-४-०२

**वाचले** :- १) या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दि.३१।०।१९९७ व पत्र दि.१९।२।२०००.
२) स्वातंत्र्य सैनिक परिवार सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पत्र दि.२३।३।२००१.
३) उप-निबंधक, सहकारी संस्था, के/प विभाग, मुंबई यांचकडील नोंदणी प्रमाणपत्र क्र.बीओएम/डब्ल्यूकेडब्ल्यू/एचएसजी (टीसी) ११०५८/सन २०००-२००१, दि. १९।२।२००१.

**आदेश** :-

मौजे वर्सोवा, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील स.नं.१६१ लगतच्या खाडी जमीनीच्या अभिन्यास क्र.७क मधील भूखंड क्र.९ क्षेत्र ७५६.५१चौ.मी. व रस्त्यात जाणा-या जागेचा अतिरिक्त चटई निर्देशांक दिल्यामुळे देय होणारे क्षेत्र ४०३.४७चौ.मी. असे एकूण ११५९.९८चौ.मी. क्षेत्र सोडतीत यशस्वी ठरलेल्या स्वातंत्र्य सैनिक परिवार सहकारी गृहनिर्माण संस्थेस जोडपत्र-एक मधील मंजूर सभासदांच्या निवासस्थानासाठी मंजूर करण्यांत येत आहे. संस्थेने जमीनीची तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु.१७,३१,७९१/- (रुपये सतरा लाख एकतीस हजार सातशे एक्याण्णव मात्र) या कार्यालयांत जमा केली आहे. संस्था सहकारी गृहनिर्माण कायद्यांतर्गत नोंदणी करुन घेतलेली आहे.

संस्थेने जमीनीची तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम भरलेली असल्याने व संस्था नोंदणीकृत झालेली असल्याने खालील अटी/शर्तीवर संस्थेस जमीन मंजूर करण्यांत येत आहे.

१) संस्थेने भरलेली जमीनीची कब्जेहक्काची रक्कम ही तात्पुरती असल्याने अंतिम कब्जेहक्काची रक्कम जास्त आल्यास ती संस्थेस मान्य असेल व दोहोंमधील फरकाची कब्जेहक्काची रक्कम संस्था विहित व्याज दराने शासनास भरण्यास तयार असेल अशा प्रकारचे रु.२०/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवरील हमीपत्र या कार्यालयांस सादर करावे.

२) संस्थेच्या १२ मंजूर सभासदांची यादी सोबत जोडली आहे. उत्पन्न गटाच्या अनुषंगाने त्यांना एकूण ६२२.५८चौ.मी. चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे. त्यामुळे उर्वरित शिल्लक ५३७.४०चौ.मी. चटई क्षेत्रासाठी उत्पन्न गटाच्या अनुषंगाने योग्य त्या संख्येने नवीन सदस्य घेऊन त्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी संस्था या कार्यालयांस सादर करील. त्यामध्ये एकूण सभासद संख्येच्या किमान २०% मागासवर्गीय सभासद असतील याची दक्षता संस्था घेईल.

३) प्रश्नाधीन जमीन कोस्टल रेग्युलेशन झोन (CRZ) मध्ये येत असल्याने त्या संदर्भातील तरतुदींचे पालन करु सी.आर.झेड चे उल्लंघन होणार नाही याची संस्था दक्षता घेईल. जमीनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथ विकास करण्यापूर्वी मुंबई महानगर पालिकेची पूर्व परवानगी घ्यावी.

४) संस्थेस जमीनीबाबत करारनामा करण्यासाठी ज्यावेळी बोलावण्यात येईल त्यावेळी करारनामा करण्यासाठी संस्थे पदाधिकारी या कार्यालयांत उपस्थित राहतील. करारनाम्यातील कोणत्याही अटी/शर्तीस हरकत न घेता संस्था अटी/शर्ती मान्य करील.

५) वरील १ ते ४ मधील अटी मान्य असल्याबाबतचे रु.२०/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवरील हमीपत्र (ज्यावर नोटरी स सही केलेली असेल) संस्था १० दिवसांत या कार्यालयांत सादर करेल. त्यानंतर जमीनीचा ताबा संस्थेस देणेबा

Scanned by CamScanner

कार्यवाही केली पाहिजे. हमीपत्र दिल्यानंतर जमीनीचा ताबा घेण्यासाठी व जमीनीच्या मालमत्ता कार्डांचा उतारा घेण्यासाठी संस्थेने नगर भूमापन अधिकारी अंधेरी/ तहसिलदार अंधेरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
श्री प्रभाकर मोरे,
सचिव,
स्वातंत्र्य सैनिक परिवार सहकारी गृहनिर्माण संस्था,
द्वारा, १९'ए' दत्तवाडी, जुना बंगला,
पहिला माळा, प्रो.व्ही.एम.आगाशे पथ,
दादर (प), मुंबई-४०० ०२८.

<u>प्रतिलिपी</u> :- १) नगर भूमापन अधिकारी अंधेरी/तहसिलदार अंधेरी यांजकडे रवाना.

२/- त्यांना कळविण्यात येते की, संस्थेने आवश्यक असलेले हमीपत्र दिल्याची या कार्यालयाशी संपर्क साधून खातरजमा करावी व तद्नंतरच प्रस्तावीन जमीनीचा ताबा संस्थेस देण्याबाबत कार्यवाही करावी व पुर्तता अहवाल जागेची ताबा पावती, नकाशा, मालमत्ता कार्डाचा उतारा या सह सादर करावा.

<u>प्रतिलिपी</u> :- कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, एच व के विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालये, आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा (प), मुंबई-४०० ०५० यांजकडे माहितीसाठी रवाना.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, सी.आर.झेड चे उल्लंघन होईल अशा कोणत्याही बाबींचा विकास करण्यास संस्थेस परवानगी देऊ नये.

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

3b-40145-mns

Scanned by CamScanner

**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडील आदेश क्र.१२/ख/एफ-०१४५, दिनांक २३ । ४ ।२००१ सोबत जोडलेली "स्वातंत्र्य सैनिक परिवार" सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर सभासदांची यादी.**

| अ.क्र. | सभासदाचे नाव | मासिक कौटुंबिक उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| १ | श्री ज्ञानदेवराव नागोजी येलकर | १८००/- |
| २. | श्री प्रभाकर हरी मोरे | २७९२/- |
| ३. | श्रीमती मालती बा. साळुंखे | (वारसाने) |
| ४. | श्रीमती इंदिरा द.महाडिक | (वारसाने) |
| ५. | श्री विश्वनाथ वि.लोध | २८८३/- |
| ६. | श्री जयराम नाना मोरे | २९०५/- |
| ७. | श्री लक्ष्मण मुरारी जाधव | २५९२/- |
| ८. | श्रीमती उमाबाई तुकाराम ससमळकर | २९९८/- |
| ९. | श्री हरी पुंगाजी जाधव (अ.जा.) | १०००/- |
| १०. | श्रीमती शारदा रामकृष्ण रावले | २५०८/- |
| ११. | श्रीमती निर्मला दामोदर कुलकर्णी | २७०६/- |
| १२. | श्री हिंदुराव बंडू जाधव (अ.जा.) | १०००/- |
| १३. | रिक्त | |
| १४. | रिक्त | |
| १५. | रिक्त | |
| १६. | रिक्त | |
| १७. | रिक्त | |
| १८. | रिक्त | |
| १९. | रिक्त | |

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

23/4/01

Scanned by CamScanner

मुंबई उपनगर मुंबई लवत.

नगर भूमापन अधिकारी, अंधेरी
यांचे कार्यालय,
सरदार वल्लभभाई पटेल नगर,
श्री स्वामी समर्थ नगर रोड
वेसावा, मुंबई 400 053.
दिनांक : ७/८/२००७

ताबे पावती :

श्री आर.ए.के.कदम श्री बा.पा म्हात्रे मंडळ अधिकारी सहायक अंधेरी परिरक्षण भूमापक, भाग वेसावे, ता. अंधेरी, नगर भूमापन अंधेरी, मुंबई उपनगर, मुंबई यांचे वतीने श्री प्रभाकर मोरे (सचिव स्वतंत्र्य सैनिक परिवार को.ऑप हौ सो. लि. मुंबई यांना मौजे वेसावा, ता. अंधेरी जिल्हा मुंबई उपनगर, मुंबई येथील सव्हे नं. (161 नजिक) हि.नं. रस्ता लगत नगर भूमापन क्र. १३२६/१ नजिक ले आऊट एक प्लॉट क्र. ८ क्षेत्र सुमारे ०५५.२ चौरस मिटर (साडेपाचशे पंचावन्न पूर्णांक दोन दशांश भाग) चा ताबा मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, मुंबई यांचे कडील आदेश क्र. ९२/डेस्क/टिए ७८५ दिनांक : २३/४/२००७ अन्वये आज दिनांक : ०७/८/२००७ रोजी (सोबत जोडलेल्या नकशांत दर्शविल्या प्रमाणे) ताबा दिला/घेतला आहे व त्याचे जागेवर सिमांकन दाखविले/पाहिले आहे.

दिनांक : ७/८/२००७

ठिकाण मौजे वेसावा ता. अंधेरी

स्वातंत्र्य सैनिक परिवार को.ऑप. हाऊ. सोसा. लि.
SWATANTRYA SAINIK PARIVAR CO.OP. HSG. SOC. LTD.
MUMBAI
मुंबई

| ताबा देणार | | ताबा घेणार |
|---|---|---|
| (सही) | (सही) | (सही) |
| परिरक्षण भूमापक क्र. 6 | मंडळ अधिकारी | सेक्रेटरी/चेअरमन |
| मौजे - वेसावा | मौजे वेसावा | |

निर्गमीत

(सही)

नगर भूमापन अधिकारी, अंधेरी

Scanned by CamScanner